**2री भारत- सिएरा लिओन परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत (10 मार्च 2025)**

11 मार्च 2025

परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीच्या (FOC) दुसऱ्या फेरीची सह-अध्यक्षता श्री. सेवाला नाईक मुडे (अतिरिक्त सचिव, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय) आणि महामहिम श्री. अलन सी.ई.लोगन (महासंचालक, परराष्ट्र मंत्रालय आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य, सिएरा लिओन शिष्टमंडळाचे प्रमुख) यांनी भूषविली. नवी दिल्ली येथे 10 मार्च 2025 रोजी सल्लामसलत पार पडली.

2. FOC मुळे उभय बाजूंनी व्यापार, गुंतवणूक, खाणकाम, कृषी, आरोग्य आणि औषधनिर्माण, शिक्षण, क्षमता निर्माण आणि दोन राष्ट्रांतील नागरिकांमधील देवाणघेवाण यासह द्विपक्षीय सहकार्याच्या प्रमुख क्षेत्रांचा समावेश असलेल्या भारत-सिएरा लिओन द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण श्रेणीचा व्यापक आढावा घेणं शक्य ठरलं. भारताने विविध क्षेत्रांमध्ये क्षमता निर्मिती आणि विकास भागीदारी पुढे निर्माण करण्यासाठी सिएरा लिओनला सहाय्य करणे सुरू ठेवण्याचे वचन दिले आहे. 'डिजिटल परिवर्तनासाठी लोकसंख्या स्तरावर राबविण्यात येणाऱ्या यशस्वी डिजिटल उपायांच्या सामायिकरणाच्या क्षेत्रात सहकार्य' या विषयावरील सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर भारताच्या बाजूने करण्यात आलेल्या प्रगतीबद्दल उभय बाजूंनी समाधान व्यक्त केले. या संबधीच्या भविष्यातील अंमलबजावणी बाबत चर्चा करण्यात आली. उभय बाजूंनी समकालीन प्रासंगिकता, संरक्षण सहकार्य, ऊर्जा विकास आणि विकास सहकार्य या प्रमुख क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय संबंध अधिक दृढ आणि वैविध्यपूर्ण करण्यावर सहमती दर्शविली.

3. सह-अध्यक्षांनी सखोल चर्चा केली आणि प्रादेशिक आणि जागतिक महत्त्वाच्या प्रमुख मुद्यांवर दृष्टीकोनांचे आदान-प्रदान केले. उभय बाजूंनी संयुक्त राष्ट्रांसह बहुपक्षीय संस्थांच्या व्यासपीठावर सहकार्यावरही चर्चा केली. सिएरा लिओनने 2028-29 या वर्षासाठी UNSC च्या अस्थायी जागेसाठी भारताच्या उमेदवारीला पाठिंबा देण्यावर सहमती दर्शविली. सिएरा लिओनने आंतरराष्ट्रीय सौर आघाडीच्या (ISA) करारावर स्वाक्षरी करण्यासाठी भारतीय औषधकोशांना मान्यता देण्यासाठी आणि ग्लोबल बायोफ्यूल्स अलायन्समध्ये सामील होण्यासाठी त्यांच्या सरकारकडून मंजुरीची प्रक्रिया जलद करण्यास सहमती दर्शविली आहे.

4. भारत आणि सिएरा लिओन यांमध्ये सौहार्द आणि मैत्रीपूर्ण संबंध राहिले आहेत. उभय बाजूंमध्ये नियमित भेटी गाठी सुरू राहिल्या आहेत. 2020 मध्ये फ्रीटाऊन मध्ये भारताचे निवासी मिशन सुरू करण्यामुळे उभय बाजूंच्या संबंधात निकटता प्राप्त झाली. भारत-सिएरा लिओन द्विपक्षीय व्यापाराने 2023-24 दरम्यान US$ 298 मिलियनचा टप्पा गाठला आहे. मागील दशकाच्या तुलनेत 3 पट वाढ झाली आहे. सिएरा लिओन हा भारताने विस्तारित केलेल्या ड्युटी-फ्री टॅरिफ प्रेफरन्स (DFTP) योजनेचा लाभार्थी आहे. ज्यामुळे भारतात मोठ्या प्रमाणात खनिजे, धातू आणि इतर वस्तूंची निर्यात वाढण्यास

मदत होईल.  अन्य क्षेत्रांमध्ये विशेषतः शेती, खनिज उत्खनन आणि औषध निर्माण, डिजिटल स्पेस इत्यादींमध्ये लक्षणीय क्षमता आहे. भारतीय कंपन्या सिएरा लिओन मध्ये वाढत्या प्रमाणात गुंतवणूक करीत आहेत आणि अलीकडील काळातील गुंतवणूक.  मेसर्स ओढाव यांनी स्क्रॅप-आधारित स्टील प्लांट मध्ये 240 मिलियन अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक उल्लेखनीय आहे.

5. मैत्रीपूर्ण वातावरणात FOC बैठक पार पडली.  उभय बाजूंनी परराष्ट्र कार्यालयाच्या सल्लामसलतींची पुढील फेरी फ्री टाउन येथे परस्पर सोयीस्कर तारखेला आयोजित करण्याचे मान्य केले.

नवी दिल्ली

11 मार्च 2025